# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा दिनांक १२/०१/२०१८**

**सभा सुचना क्र. २४ स. ११.३० वा.**

| अ क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | मागील मा. स्थायी समिती सभा दि.२९/१२/२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | ठराव :- मागील मा. स्थायी समिती सभा दि. २९/१२/२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणेत येत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. अजीत नाईक सूचक :- मा.श्री.वृंदेश पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| २. | प्रभाग समिती "एफ" धानिव/पेल्हार क्षेत्रातील प्रभाग क्र. ०५ मधील शिरसाड येथे दिवापाडा अंतर्गत पेव्हर ब्लॉक बसविणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत कामाला प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. त्यानुसार सदर काम करणेस व सदर कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कम रू. १९९४२२१/- इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. सदर कामी विहीत प्रणालीनुसार निविदा मागविणेस व त्या अनुषंगाने येणाऱ्या रू. १९९४२२१/- खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे<br>अनुमोदक :- मा.श्री . किशोर ना. पाटील सूचक :- मा.श्री. दिक्षा घरत<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| ३. | स्वच्छ भारत सर्वेक्षण २०१८ अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिकेत स्वच्छता विषयक सेवासाठी त्या क्षेत्रातील तज्ञ सल्लागाराची केलेल्या नेमणूकीस व खर्चास आर्थीक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- स्वच्छ सर्वेक्षण २०१८ हे माहे जानेवारी मध्ये होणार असल्याने महापालिकेचा विविध घटकांसाठी गुणस्तर सुधारून उद्दीष्ट साधण्यासाठी तज्ञ सल्लागार म्हणून National Informatics Centre Services Ine. (NICSI) (मार्फत M/s KPMG Advisory Services Private Limited Mumbai) यांची नेमणूक करण्यास प्रशासनाने केलेल्या विहीत कार्यवाही ही सभा मंजूरी देत असून सदर कामी येणाऱ्या NICIS च्या मंजूर दरकरारानुसार रू. १६,८५,५७१/- खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री.वृंदेश पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| ४. | प्रभाग समिती 'आय' कार्यालय क्षेत्रातील विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक पुरविणे व बसविणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर कामास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. २२८ दि. २०/०४/२०१५ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करून सकारात्मकदृष्ट्या मे.धनराज कन्स्ट्रक्शन ह्यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा ४.००% जास्त दराने निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम ७३ (क) अन्वये संविदा करणेत मान्यता देण्यात येत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |

| | | |
|---|---|---|
| ५. | प्रभाग समिती जी मधील वॉर्ड क्र. ७५ मध्ये सातीवली स्मशानभूमी विकसीत करणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- उपरोक्त निविदांची तुलना करता मे. द्वारका कन्स्ट्रक्शन ह्यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा (-) ५.९०% कमी दराची सर्वात कमी व वाजवी आहे. त्याप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. मा. आयुक्त यांचे शिफारशीनुसार संविदा करणेंस ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री. किशोर ना.पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ६. | प्रभाग समिती जुना ड नवीन मधील वॉर्ड क्र. जुना ६० नवीन ८८ मधील चिंचपाडा येथे राजयोग इंड. ते गाडवेल इंड. ते रिध्दी सिध्दी व मेहता पटेल इंड. ते एव्हरशाईन इंड. पर्यत पाईप गटार व फुटपाथ बांधणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदाकरण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- उपरोक्त निविदांची तुलना करता मे. सुरेश एंटरप्रायजेस ह्यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा १३.०१% कमी दराची कमी दराची सर्वात कमी व वाजवी आहे. त्याप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देणेकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांचे शिफारशीनुसार संविदा करणेंस मी सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.वैभव पाटील सूचक :- मा.श्री. सखाराम महाडिक**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ७. | प्रभाग समिती जुना ड नवीन जी मधील वॉर्ड क्र. जुना ६० नवीन ८८ मधील चिंचपाडा येथे गार्डवेल इंडस्ट्री , मेहता पटेल इंडस्ट्री व हरी हरी इंड. रस्ते खडीकरण व डांबरीकरण करणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- उपरोक्त निविदांची तुलना करता मे. नितेश मोहन मलवानी ह्यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा ९.९९% कमी दराची कमी दराची सर्वात कमी व वाजवी आहे. त्याप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देणेकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांचे शिफारशीनुसार संविदा करणेंस मी सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. विद्या पाटील सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ८. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या विकास आराखडयातील मौजे बोळींज आरक्षण क्र. १६२ (प्ले ग्राऊंड)मध्ये क्रिडा | ठराव :- उपरोक्त निविदांची तुलना करता मे. एन.ए.कन्स्ट्रक्शन प्रा.लि. ह्यांची निविदा अंदाजपत्रकाच्या (+) १४.४०% (वाटाघाटीनंतर १२.४०% जास्त दराने सर्वात कमी व वाजवी आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये या कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त यांनी मंजूरी दिली असून संविदा करणेंस मान्यता देणेकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस |

| | | |
|---|---|---|
| | संकुल व क्लब हाऊस विकसीत करणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | केली आहे. मा.आयुक्त यांचे शिफारशीनुसार संविदा करणेस ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ९. | सन २०१७- १८ हया वित्तीय वर्षात मोकाट व पिसाळलेल्या जनावरांचा बंदोबस्त व मादी श्वान निर्बिजीकरण करणे लेखा शिर्षामध्ये तरतुद कमी असल्याने पुर्नविनियोजन प्रस्तावास मंजुरी मिळणेबाबत. | ठराव :- सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात मोकाट व पिसाळलेल्या जनावरांचा बंदोबस्त व मादी श्वान निर्बिजीकरण करणे या लेखाशिर्षामध्ये तरतूद कमी असल्याने रक्कम रू. ५० लक्ष पुर्न:विनियोजन करून मागील प्रलंबित व पुढील येणारी देयके अदा करणेस ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर ना. पाटील सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १०. | वसई विरार शहर महानगरपालिका व वसई विकासिनी संचालित वसई विकासीनी दृककला महाविदयालय यांच्या संयुक्त विदयमाने आयोजित १४ वी प्रत्यक्ष राज्यस्तरीय निसर्ग चित्रण स्पर्धेसाठी वित्तसहाय्य देणेबाबत. | ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिका व वसई विकासनी संचालित वसई विकासीनी दृककला महाविद्यालय यांच्या विद्यमाने दि. १४ सप्टेंबर २०१७ रोजी मध्ये वसई विरार पूर्व ,पश्चिम विभागातील शाळेतील १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी बालचित्रकला स्पर्धा २०१८ चे आयोजन केले आहे आणि १४ वी प्रत्यक्ष राज्यस्तरीय, निसर्गचित्रण स्पर्धा, वाळूशिल्प स्पर्धा आणि प्रत्यक्ष व्यक्तिचित्रण स्पर्धा सन २०१७-१८ मध्ये आयोजित करणेकामी आजची ही सभा सर्वानुमते आर्थिक मंजूरी देत असून सदरचे कार्यक्रमाचे आयोजनासाठी रू. ३,००,०००/- इतके आर्थिक सहाय्य वसई विकासनी कॉलेज ऑफ व्हीज्युअल आर्ट्स या संस्थेस वसई विकासनी या नावे धनादेशाद्वारे /RIGS द्वारे अदा करणेकामी आजची ही सभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. किशोर ना. पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ११. | महानगरपालिकेच्या प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील भाबोळा ते वसई या मुख्य रस्त्यालगत विजय सेल्स, व डिमार्ट समोरील जागेत दुचाकी व चारचाकी वाहनतळ तयार करुन पार्कींग भाडे वसुली करणे कामी अभिकर्ता नेमणे बाबत. तसेच पार्कींग भाडे दर निश्चित करणेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देणेबाबत. | ठराव :- वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेंत आली. त्यानुसार प्रति २ तासाकरीता दुचाकीसाठी रू. १० व चारचाकीसाठी रू. २० तद्नंतर प्रत्येक वाढीव तासांकरीता रू. ५ ने वाढ करण्यांत यावी. तसेच याकरीता ३ वर्षाकरीता अभिकर्ता नेमणेसाठी निविदा मागविणेंत याव्यात व प्रतिवर्षी १०% वाढ करून निविदा मंजूर करून घेणेंत यावी असे ही सभा ठरविते. वरील प्रमाणे दर निश्चित करून याकामी योग्य ती ई-निविदा मागविणेस व इतर प्रक्रिया करणेंस व त्या अनुषंगाने होणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| १२. | वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये दि. ११/१२/२०१७ ते दि. १७/१२/२०१७ व दिनांक १८/१२/२०१७ ते दि. २४/१२/२०१७ या कालावधीत लागलेल्या आगी व झालेल्या दुर्घनांचे प्रतिवृत्त माहितीसाठी स्थायी समिती सादर. | ठराव :- सदर बाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. प्रस्तावातील माहिती मा.स्थायी समिती सभेत अवलोकन केली. त्यानुसार संबंधितांने नोंद घेवून कार्यवाही करणेंस सभेने एकमताने मंजूरी दिली.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अजीत नाईक सूचक :- मा.श्री.कन्हैय्या भोईर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १३. | अग्निशमन विभागातील ४० मीटर उंचीचे वाहन टर्न टेबल लॅडर (T.T.L) वाहनाकरीता 'एक्सटेंशन सिलेंडर ऑफ द लॅडर सेट' खरेदी करुन अग्निशमन केंद्रातच त्याची जोडणी करुन कार्यान्वित करणेच्या खर्चास व पुन:र्विनियोजनाच्या प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | ठराव :- अग्नीशमन विभागातील ४० मीटर उंचीचे टर्न टेबल लॅडर वाहनाकरीता एक्सटेंशन सिलेंडर ऑफ व लॅडर सेट या शिडीच्या भागाचे दुरुस्ती बाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली. सदर वाहन विदेशातुन आयात केले असल्याने भारतामध्ये कंपनीचे अधिकृत विक्रेते ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्यूशन प्रा.लि. बेंगलोर हे एकमेव आहेत. अन्य कोणतेही सर्व्हिस पुरवठादार नाहीत. तसेच सदर वाहनाची देखभालीची व किरकोळ दुरुस्तीचे कामे ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्यूशन प्रा.लि. बेंगलोर यांचेकडून करण्यात येतात. त्यामध्ये मोठ्या स्वरुपाच्या दुरुस्तीचा समावेश नाही. त्यामुळे रोझनबार कंपनीकडून अथवा त्यांचे अधिकृत सर्व्हिस स्टेशन ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्यूशन प्रा.लि. बेंगलोर यांचेकडून शिडी व दुरुस्तीचे काम करावे लागेल. कंपनी विदेशात असल्याने वाहन दुरुस्तीची प्रक्रिया करण्यास बराच कालावधी लागेल. याकरीता वाहन फार काळ बंद राहून नये याकरीता रोझनबार कंपनीचे अधिकृत सर्व्हिस स्टेशन ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्यूशन प्रा.लि. बेंगलोर यांचेकडून ४० मीटर टर्न टेबल लॅडर वाहनाची शिडी दुरुस्तीचे काम विना निविदा थेट त्यांचे दरपत्रकामधील मंजूर दराने करण्यास व त्यासाठी येणाऱ्या रक्कम रु. १३ लक्ष पर्यंतच्या खर्चास तसेच नमुना क्र. १० मध्ये सादर केलेल्या विवरणपत्रानुसार अग्निशमन वाहन व्यवस्थापन ठेका या लेखाशिर्षामधून रक्कम रु. ४० लक्ष रक्कमेचे अग्निशमन व्यवस्था वाहन दुरुस्ती निगा/कटर मशिन दुरुस्ती निगा या लेखाशिर्षामध्ये पुर्न:विनियोजनास ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री.अजीत नाईक**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १४. | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १०५ नुसार प्रभाग समिती एच व आय आणि त्या अंतर्गत येणाऱ्या उपविभागीय कार्यालयांचा लेखापरिक्षण अहवाल मा.स्थायी समिती सभेपुढे सादर करणेबाबत. | ठराव :- उपरोक्त सादर केलेल्या संबंधित प्रभाग समिती एच व आय आणि त्या अंतर्गत येणाऱ्या उपविभागीय कार्यालयाच्या लेखापरिक्षण अहवालावर सविस्तर चर्चा करण्यांत आली. संबंधित प्रभाग समिती एच व आय चे लेखाधिकारी व त्या संबंधित अधिकारी खुलासा करण्यासाठी स्थायी समिती सभागृहात उपस्थित नसल्याने स्थायी समितीचे सदर अहवालातील तरतूदींबाबत समाधान झालेले नाही. सबब सदरचा विषय तुर्तास स्थगित ठेवावा व पुढील स्थायी समिती सभेपुढे चर्चेसाठी सादर करावा, अशी आजची स्थायी समिती सभा ठरवित आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| १५. | वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील जाहीरात कराविषयी सुधारणा राबविणेकामी आलेल्या जास्त दराच्या ई-निविदेस मंजुरी देणेबाबत. | ठराव :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २४४,२४५, व ३८६ नुसार महानगरपालिकेला सहाय्य करणे, महानगरपालिकेने वेळोवेळी मंजूर केलेल्या लायसन्स फी दरानुसार महसूल गोळा करणे, व आवश्यकतेनुसार व मंजुरीनुसार नवीन जाहिरात मिडिया उभारणीसाठी महानगरपालिकेला सहाय्य करणे या कामी मे. विजास डीजीटल(आय) प्रा.लि. यांची नेमणूक करणेसाठी मंजूरी देत आहे व त्यांनी सादर केलेल्या रु.२,४०,००,०००/- (दोन कोटी चाळीस लक्ष मात्र) च्या निविदेसोबत संविदाकरणे व पुढील अमलबजावणी करीता मा.आयुक्त यांना प्राधिकृतकरीत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. कन्हैय्या भोईर सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |

नगरसचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका